सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग अमरावती शहर
ITI कॉलेज समोर, मोर्शी रोड, अम. फोन क्र. 0721- 2660330
E-mail- acptraffic.cpamt@mahapolice.gov.in

जा.क. सपोआ (वा)/प्रेस नोट /2025

दिनांक :- 04/01/2025

**प्रेस नोट**

पोलीस वर्धापन सप्ताह निमीत्त दिनांक 04/01/2025 रोजी मा.श्री.नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर, मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त मुख्यालय,अमरावती शहर, श्री गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ1), श्री सागर पाटील, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-2) अमरावती शहर यांचे संकल्पनेतुन पोलीस दलाच्या कामकाज, रस्ते सुरक्षा व वाहतुक नियम याबाबत सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी याच्या मध्ये जनजागृती करण्या करिता रेझिंग डे निमीत्त शनिवार दिनांक 04/01/2024 रोजी सकाळी 10.30 वा. भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

जनजागृती रॅली मध्ये प्रतिकात्मक यम याचे वाहन सर्वात समोर राहुन त्या व्दारे वाहन चालवितांना अतिघाई कसे मृत्युला आमंत्रण देते याबाबत संदेश देणे हा होता. यानंतर स्वत: मा. श्री गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ1), श्री सागर पाटील, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-2) अमरावती शहर हे वाहतुक विभागाचे अधिकारी व अंमलदार यांचेसह हेल्मेट परिधान करुन दुचाकी वाहनावर रॅलीमध्ये सहभागी होते. त्यासोबतच रॅलीमध्ये पोलीस पत्नी व सामाजिक सुरक्षा संस्थेच्या महिला यांनी लालफेटे, समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा येथील प्राचार्य डॉ.श्री.राजकुमार दासरवाड व त्यांचे विद्यार्थी यांनी पिवळे फेटे व लॉयन्स क्लब,अमरावतीचे पदाधिकारी यांनी हिरवे रंगाचे फेटे परिधान केले होते. यामधुन सिग्नल दिव्याच्या रंगाचे महत्व पटवुन देणे हा उददेश होता. रॅली मध्ये एन.सी.सी. व आर.एस.पी. च्या विदयार्थ्यानी सुध्दा उत्सफुर्त सहभाग नोंदविला होता. यामागे पोलीस विभागाचे श्वान पथक, दामिणी पथक, क्यु.आर.टी.स्कॉड, आर.सी.पी.स्कॉड, डायल 112 वाहन, सायबर व्हॅन, इंटरसेप्टर मोबाईल यांचा समावेश होता. याव्दारे पोलीस दलातील वेगेवेगळया विभागाव्दारे चालणाऱ्या कामकाजाची माहिती सर्व सामान्य जनतेला देणे हा मुख्य हेतू होता. रॅली मध्ये सहभागी व्यक्तींच्या हाती वाहतुक नियमांची जनजागृती संबंधाने वेगवेगळी घोषवाक्य फलकाव्दारे संदेश देण्यात आला.

सदर रॅलीला मा.श्री.नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी हिरवी झेंडी दाखवुन पोलीस मुख्यालय, कवायत मैदान, अमरावती शहर येथुन सुरुवात झाली. रॅलीमध्ये मा.श्री.नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर, मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त मुख्यालय,अमरावती शहर, मा. संजय खताळे, सपोआ वाहतुक, श्रीमती रिता उईके,पो.नि.शवाशा पश्चिम, श्रीमती ज्योती विल्लेकर, पो.नि.शवाशा पुर्व तसेच पोलीस आयुक्तालय अमरावती येथे पोलीस स्टेशन व शाखेत कार्यरत अधिकारी अंमलदार सहभागी होते. जनजागृती रॅली सुंदरलाल चौक, चपराशीपुरा चौक- बियाणी चौक - वेलकम टी पॉइंट - पंचवटी चौक - शेगाव नाका चौक - गाडगेनगर - बाबा कॉर्नर - ट्रॉफीक ऑफीस - इर्विन चौक - मा. पोलीस आयुक्त कार्यालय पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथे समापन झाले.

पोलीस स्थापना दिना निमीत्य पोलीस विभागाव्दारे आयोजीत बाईक रॅलीचा उददेश सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी यांना पोलीस विभागाच्या कामकाजाची सखोल माहिती देणे, पोलीस व जनतेतील समन्वय आणखी दृढ करणे तसेच वाहतुक नियमांचे पालन न केल्यामुळे घडणाऱ्या अपघातात होणारी जिवीत हानी, मानसिक त्रास व आर्थिक नुकसान टाळण्याकरीता वाहतुक नियमांचे महत्व तसेच हेल्मेट व सिटबेल्टचा नियमीत वापर आपल्या कसे जिवनदान देवू शकते ! याबाबीचे सर्वसामान्य नागरिकांना रस्ते सुरक्षा बाबत महत्व पटवुन देणे हे होते.

**प्रती :- मा.संपादक, --------------**

**सदर प्रेसनोट जनहितार्थ असल्याने आपले वर्तमान पत्रात प्रकाशित करुन सहकार्य करावे.**